**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : मनोहर तावजी केंगले,
वय : ३९ वर्षे,
नियुक्ती जवान, राज्य उत्पादन शुल्क तळेगाव दाभाडे, ता. मावळ,जि पुणे.
राहणार : मंचर, पुणे

**<u>सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके</u>**

१. घटनेच्यावेळी मी जवान या पदावरती राज्य उत्पादन शुल्क नारायणगाव विभाग, पुणे येथे बीट क्र.२ मध्ये कार्यरत होतो. सदरची घटना दि.०७/०२/२०२० रोजी घडली. त्या दिवशी मी कार्यालयात हजर असतांना साहेबांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, हॉटेल कृष्नीका, पारगाव शिंगवे, ता. आंबेगाव, जि. पुणे या ठिकाणी एक इसम अवैधरीत्या दारुची विक्री करत आहे.

२. साहेबांनी मला दोन पंच घेवून येण्यास सांगितले. मी दोन पंचाना बोलावुन आणले त्यानंतर साहेबांनी त्या दोन पंचाना सदर बातमीचा आशय सांगितला. त्यानंतर आम्ही दोन पंच, सर्व आवश्यक साहित्य व लॅपटॉप घेवून खाजगी वाहनाने बातमीच्या ठिकाणी छापा टाकण्यास गेलो. बातमीच्या ठिकाणाच्या जवळ आडबाजूला आम्ही वाहन उभे केले. पायी चालत आम्ही हॉटेल कृष्नीका येथे गेलो. तेथे काउंटरजवळ एक इसम बसलेला दिसला. त्यानंतर साहेबांनी त्याला तेथे येण्याचा उद्देश सांगितला. त्याला साहेबांनी स्वतःचा व आम्हा सर्वांचा परीचय करुन दिला.

३. त्यानंतर सदर इसमासह व दोन पंचासमक्ष आम्ही त्या घराचा शोध घेतला असता हॉटेलच्या किचनमध्ये एका कोप-यामध्ये बारदाणाखाली पुठ्याचा बॉक्स मिळुन आला. त्यानंतर साहेबांनी त्या बॉक्स पाहणी केली असता त्यामध्ये देशी जी. एम. संत्राच्या १५ बाटल्या व विदेशी मद्य ऑफीसर चॉईस कंपनीच्या १८० एम.एल. च्या २ सिलबंद बाटल्या असा एकुण रक्कम रु.१०४०/- मुद्देमाल मिळुन आला. त्यानंतर साहेबांनी त्याच्याकडे चौकशी

केली असता सदर इसमाने त्या बाटल्या विक्रीसाठी ठेवल्या आहेत असे सांगितले. त्यावर साहेबांनी त्याला दारु विक्रीचा परवाना आहे का असे विचारले असता त्याने त्याच्याकडे दारु विक्रीचा परवाना नाही असे सांगितले.

४. त्यानंतर साहेबांनी जप्त मुद्देमालापैकी देशी दारु जी. एम. संत्रा कंपनीची एक बॉटल रासायनिक पृथकरणासाठी नमुना म्हणून बाजुला काढली. त्यावरती साहेबांच्या व पंचाच्या सहीचे लेबल लावून ती बॉटल लाखेने सिलबंद केली. सदर घटनेचा साहेबांनी पंचासमक्ष पंचनामा केला. त्यानंतर आम्ही मुद्देमाल व आरोपीस घेऊन कार्यालयात आलो व मी आरोपीविरुध्द सरकारतर्फे फिर्याद दिली.

५. आता मला दि.०७/०२/२०२० रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२१** देण्यात येते. आता मला दि.०७/०२/२०२० रोजीची छापिल फिर्याद दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२२** देण्यात येते. मी आरोपी सुरेश सहादु ढोबळे ला ओळखतो. आजरोजी तो न्यायालयात हजर नाही. आरोपीचा गैरहजेरी माफीचा अर्ज अभिलेखावर दाखल आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास : आरोपीतर्फे वकील श्री. एम. के. वळसे यांच्या मार्फत शपथेवर सुरु**

६. नारायणगाव ते भिमाशंकर कारखाना यातील अंतर ३० कि.मी. चे आहे. साहेबांना सकाळी १०.३० वाजता गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली. सदर गुन्ह्यातील पंचाची शेती कार्यालयाच्या जवळ आहे. छापा कारवाईकरीता आम्ही साहेबांच्या खाजगी वाहनाने गेलो. छापा कारवाईकरीता लागणा-या साहित्याची स्टेशन डायरीला नोंद केली होती. हॉटेल कृष्नीकाचा सर्वे नंबर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, भिमाशंकर कारखान्याच्या आजुबाजूला अनेक छोटी मोठी दुकाने, हॉटेल्स आहेत. हे म्हणणे खरे आहे की, भिमाशंकर कारखान्याच्या गेटजवळच हॉटेल कृष्नीका आहे. सदर हॉटेलच्या मालकाचे नाव

मला सांगता येणार नाही. जप्त मुद्देमालाचा व रासायनिक पृथकरणासाठी काढलेल्या नमुना बाटलीचा बॅच नंबर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा हा हाताने लिहिलेला नसुन छापिल आहे. हे म्हणणे खरे आहे की, छापिल पंचनामा तयार करण्यासाठी प्रिंटर, लाईट व लॅपटॉपची आवश्यकता आहे. आरोपीच्या ताब्यातुन मुद्देमाल जप्त करतांना त्याचे फोटोग्राफ काढले नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त मुद्देमाल आजरोजी न्यायालयात नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त मुद्देमालाचे काय केले याबाबतचे लेखी पत्र अभिलेखावर नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, चुकीच्या माहितीच्या आधारे मी खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**

**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि. ०२/०१/२०२६**
**घोडेगाव**